# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### निवती (ता.वेंगुर्ले, जि.सिंधुदूर्ग) गावात झालेल्या तौक्ते चक्रीवादळातील नुकसानग्रस्ताना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१) ४५६३९ (०९-१०-२०२२) . श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवती (ता.वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग) गावात दिनांक १६ मे, २०२१ रोजी झालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे येथील ग्रामस्थांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर घटनेस एका वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही अद्यापपर्यंत शासनाकडून निवती गावातील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तौक्ते चक्रीवादळात नुकसान झालेल्या निवती गावातील ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१६-०३-२०२४) :** (१) होय.

(२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक १६ मे, २०२१ रोजी तौक्ते चक्रीवादळामध्ये झालेल्या मालमत्तेच्या नुकसानीकरिता वेंगुर्ला तालुक्यातील मेढा निवती गावातील १४९ बाधित मच्छिमारांसाठी रु.६०,५०,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच त्या गावातील एका घराच्या पूर्णत: नुकसानी प्रकरणी एकूण रु.१,३०,०००/- इतकी रक्कम आपतग्रस्तास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मागणीप्रमाणे अनुदान प्राप्त न झाल्याने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग/विभागीय आयुक्त, कोकण यांनी अतिरिक्त निधीबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.२२३/म-३, दिनांक २१.०२.२०२४ अन्वये रु.३९५.२२ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्याच्या वन विभागात सहाय्यक ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या पदांच्या पदोन्नतीबाबत

**(२) ६५१३७ (२४-०८-२०२३) . श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वन विभागात सहायक वनसंरक्षक ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या पदांना पाच-सहा वर्षातच पदोन्नती दिली असून वनसंरक्षक ते वनपरिक्षेत्राधिकारी यांना पदोन्नतीकरीता १५ वर्षं प्रतीक्षा करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वनविभागात प्रादेशिक, वन्यजीव, वनीकरण, कार्य आयोजना, रोजगार हमी योजना असे उपविभाग तयार करण्यात आल्यानंतर वनकर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोणतेच धोरण आखलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मागील तीन वर्षांपासून राज्याच्या वनविभागात सहायक वनसंरक्षकांना बढती न दिल्यामुळे बढतीने भरली जाणारी विभागीय वन अधिकारी ५५ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदे भरली नसल्याने वनविभागात कामाचा ताण वाढला तर आएफएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची गर्दी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सहायक वनसंरक्षक या पदावरुन विभागीय वन अधिकारी वदावर बढती देण्याकरिता सहायक वनसंरक्षकाची वन भवनातून यादी प्रकाशित झाली असून सदर यादीत सेवानिवृत्त व मृत अधिकाऱ्यांच्या नावाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल यांना वरिष्ठ संवर्गात पदोन्नती देताना पदोन्नती पात्रतेच्या सर्व अटी व शर्ती पुर्ण करणे आवश्यक असते. पदोन्नती प्रक्रीया ही शासनाच्या प्रचलित नियमानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे विचारात घेऊन करण्यात येते. तसेच, भारतीय वन सेवेतील अधिका-यांना पदोन्नती देण्याची तरतूद भारतीय वन सेवा (संवर्ग) नियम, १९६६ मध्ये असून त्यानुसार पदोन्नतीबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

वन विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध दिनांक १३.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच सुधारीत आकृतीबंधानुसार वनविभागातील विविध उपविभागाकरीता दिनांक २१.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदांचे पुर्नगठण करण्यात आले आहे. तसेच सुधारीत आकृतीबंधात खालीलप्रमाणे पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

| **अ.क्र.** | **संवर्ग(पदनाम)** | | **पदसंख्या** |
|---|---|---|---|
| १ | सहायक संचालक | - | ०१ |
| २ | सहायक रासायनिक विश्लेषक | - | ०१ |
| ३ | मंडळ निरिक्षक | - | ०१ |
| ४ | वनरक्षक | - | २१६ |
| ५ | अव्वल कारकुन | - | ०१ |
| | **एकूण** | | **२२०** |

(३) होय,

वन विभागामध्ये दिनांक ३१.०७.२०२३ व दिनांक ०४.०८.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये एकूण ७७ सहायक वन संरक्षक यांना विभागीय वन अधिकारी पदावर पदोन्नती दिली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी कार्यालयात आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(३) ६६००१ (२७-०८-२०२३) . श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी कार्यालयात सातबारा उतारा घेणे, नोंद लावणे, बोझा चढविणे किंवा कमी करण्यासाठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या स्थानिक नागरिकांच्या तक्रारी असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये

वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठ्याच्या डिजिटल सातबा-यासह जमिनीचा दाखला काढणे, नक्कल काढणे, बोझा चढविणे व उतरविणे, निराधार योजना, दिव्यांग योजना, उत्पन्नाचा दाखला आदि कामे शासकीय नाममात्र फी मध्ये होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावंर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) स्थानिक दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीत तलाठी कार्यालय मालेगाव कॅम्पबाबत प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार उपविभागीय अधिकारी मालेगाव व तहसिलदार, मालेगाव यांच्या निर्देशान्वये नायब तहसिलदार संगायो यांचे मार्फत दिनांक २६.०५.२०२३ रोजी तलाठी कार्यालय मालेगाव कॅम्प येथे अचानक भेट देऊन कार्यालयात विविध कामासाठी हजर असलेल्या १० ते१२ व्यक्तीकडे कार्यालयात करण्यात येत असलेल्या कामकाजाबाबत चौकशी केली असता कार्यालयीन कामकाजाबाबत कोणतीही तक्रार नाही. तसेच अतिरिक्त पैशाची मागणी केली जात नसल्याचे उपस्थित व्यक्तींनी समक्ष सांगितले आहे.त्यांचा जबाब नोंदविण्यात आला आहे. तसेच यापुढे सदर बाबतीत दक्षता घेण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) येथील सावदा, चिनावल शेतशिवारात केळी पिकाचे नुकसान झाल्याबाबत**

**(४) ६६१६५ (२५-०८-२०२३) . श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) येथील सावदा, चिनावल शेतशिवारात यंदा उन्हामुळे केळी पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथील बाधित केळी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (११-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) १ मे ते ३१ मे, २०२३ या कालावधीमध्ये सलग ५ दिवस ४५ डिग्री सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमान या हवामान धोके अंतर्गत रावेर तालुक्यातील ऐनपूर, खानापुर, खिर्डी बु, खिरोदे प्र.यावल, निंभोरे बू, रावेर व सावदा या महसूल मंडळातील २०,७७६ शेतकरी पुनर्रचित हवामान आधारित फळ पिक विमा योजनेत पात्र झालेले असून त्यासाठी रू.१४३.५१ कोटी देय होते. आतापर्यंत १६,४७६ शेतकऱ्यांना रू.१२०.७१ कोटी रक्कम पिक विमा कंपनीमार्फत विमाधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली असून, उर्वरित रक्कम जमा करणेची कार्यवाही पिक विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील देवस्थानच्या जमिनीची मालकी नसल्यामुळे शेतीवर मिळणाऱ्या विविध सरकारी योजना आणि अनुदाने शेतकऱ्यांना मिळत नसल्याबाबत

**(५) ६६४५० (३१-०८-२०२३) . श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देवस्थानच्या जमीनी शेतकरी पिढ्यानपिढ्या कसत आहेत मात्र त्यांना मालकी नसल्याने संबंधित शेतक-यांना पीक कर्ज, शासनाच्या शेतीविषयक सुविधांचा लाभ घेता येत नसल्यामुळे शेतक-यांना कर्जमुक्ती व या जमिनी कसणाऱ्याच्या नांवावर करुन द्याव्यात अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात स्वातंत्र्यानंतर शासनाने इतर सर्व प्रकारची इनामे खालसा केली, परंतु इनाम वर्ग-३ खालसा न केल्याने अद्यापही या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे झाले नसल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना पीककर्जासह शेतीवर मिळणाऱ्या विविध सरकारी योजना आणि अनुदाने मिळू शकत नाहीत तसेच पिकांचे नुकसान झाले तर त्या नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इनाम वर्ग ३ खालसा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०२-२०२४) :**(१) , (२) , (३) व (४) होय. हे खरे आहे.

देवस्थान जमिनीला वित्तीय संस्थाकडून कर्ज उपलब्ध होत नसलेबाबत तक्रार प्राप्त होत आहेत. तथापि देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमीनी या अहस्तांतरणीय असल्यामुळे बँकेकडून कर्ज घेण्यासाठी सदरच्या जमीनी बँकेला तारण म्हणून देता येणार नाहीत.

तसेच राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरिता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांसह तहसीलदाराना शासकीय कामकाजासाठी नवीन शासकीय वाहने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) ६६९४२ (३०-०८-२०२३) . श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अलिबाग, महाड, श्रीवर्धन (अलिबाग, जि.रायगड) येथील उपविभागीय अधिकारी तसेच अलिबाग, पेण, खालापूर, रोहा, सुधागड, महाड व श्रीवर्धन येथील तहसीलदारांची वाहने दूरवस्थेत असल्याने मंत्र्यांचा दौरा व अन्य शासकीय कामाच्या वेळी ही वाहने न वापरता खाजगी वाहनांचा वापर करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा स्तरावरील योजना गाव पातळीवर राबविणे, शांतता राखणे, आपत्कालीन परिस्थितीची, दाखले, वारस नोंदी,निवडणूक प्रक्रिया, इ.कामे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्या मार्फत केली जातात. त्यांचा कृषी, ग्रामपंचायत, पोलीस अशा अनेक विभागाशी संबंध येतो, परंतु जिल्ह्यातील तीन उपविभागीय अधिकारी, सात

वि.स. २३७ (5)
तहसीलदार हे दूरवस्था झालेल्या जुन्या सरकारी गाड्या वापरुन अनेक वर्ष शासकीय कामकाज करीत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन रायगड जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांसह तहसीलदारांना जुन्या दूरवस्था झालेल्या शासकीय वाहनाऐवजी नवीन सुसज्य वाहने उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१) , (२) व (३)

जिल्हाधिकारी, रायगड व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वाहनांची आवश्यकता विचारात घेऊन जुन्या २२ निर्लेखित वाहनाऐवजी नवीन वाहन खरेदीस महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६/०२/२०२४ अन्वये मंजूरी दिली आहे. परिणामी वाहनांअभावी गैरसोय होणार नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महसुली विभागाच्या जमिनींची माहिती संकलित करण्याकरीता अद्ययावत यंत्रणा उभारण्याबाबत**

**(७) ६७७०१ (०३-०९-२०२३) . श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन व देवस्थान, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासासाठी समाविष्ट जमिनी, वतन भाडेपट्ट्याच्या सरकारी जमिनी, देवस्थान इनाम, आदिवासी खातेदार, वन, भूमीधारी हक्कान्वये, भूसंपादन केलेल्या जमिनी, कुळ वहिवाट, कमालधारणा कायद्याअंतर्गत जमिनी अशा १६ प्रकारच्या जमिनींची एकत्रित माहिती महसूल विभागाकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जमिनींचे व्यवस्थापन आणि संरक्षण करण्यात येत नसल्याने त्यावर अतिक्रमण, शासकीय जमिनीची विक्री व जमीनीचे गैरव्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असल्याच्या तक्रारी महसूल विभागाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन व देवस्थान आणि भाडेपट्ट्याने असणाऱ्या १६ प्रकारच्या जमिनीची एकत्रित माहिती संकलित करण्याकरिता रेवेन्यू रेकॉर्ड रजिस्ट्री फ्रेमवर्क या प्रकल्पाअंतर्गत जमिनीचे रेकॉर्ड अद्ययावत केल्यास शासकीय जमिनीचे व्यवस्थापन, माहिती व तपासणी करणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर रेवेन्यू रेकॉर्ड रजिस्ट्री फ्रेमवर्क प्रकल्प राबवण्याबाबत शासनाने सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

महसूल विभागाकडील तलाठी दप्तरामधील गांव नमुना- एक-क नोंदवही स्वरूपात सदर बाबतची माहिती ही अद्ययावत केली जाते.

भोगवटा वर्ग-दोन जमिनींची नोदवही गाव नमुना- एक-क यामध्ये सोळा प्रकारच्या जमिनीच्या नोंदी ठेवल्या जातात. तसेच वन जमीनींची नोंद ही गाव नमुना १ अ मध्ये ठेवण्यात येते.

अशा विशिष्ट तक्रारी शासनाकडे प्राप्त नाहीत. तथापि भोगवटादार वर्ग-२ जमीनींचे व्यवहार हे ई-फेरफार या संगणकीकृत प्रणालीने प्रतिबंधित करणेत आले आहे. केवळ तहसिलदार यांचेकडील परवानगीनंतरच अशा व्यवहारांची दस्त नोंदणी करता येते.

(३) व (४) हे खरे आहे.

वन व देवस्थान आणि निर्बंधीत सत्ताप्रकार असणाऱ्या १६ प्रकारच्या जमिनीची एकत्रित माहिती संकलित करण्याकरिता रेवेन्यू रेकॉर्ड रजिस्ट्री फ्रेमवर्क या प्रकल्पाअंतर्गत जमिनीचे रेकॉर्ड अद्ययावत केल्यास शासकीय जमिनीचे

व्यवस्थापन, माहिती व तपासणी करणे शक्य होणार आहे.

तलाठी दप्तर संगणकीकृत करणेसाठी राज्य शासनाच्या सुचनेनुसार जमाबंदी आयुक्त कार्यालयाने ई-चावडी ही संगणकीकृत प्रणाली निर्माण केली आहे. सदर प्रणालीमध्ये राज्यातील सर्व गाव दप्तरे संगणकीकृत करून त्यातून निर्माण माहितीच्या आधारे मंडळ, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील संकलित माहिती निर्माण करण्याचा रेवेन्यू रेकॉर्ड रजिस्ट्री फ्रेमवर्क हा प्रकल्प जमाबंदी आयुक्तालयाने हाती घेतला आहे. त्याबाबत प्राथमिक टप्प्यांची कार्यवाही पूर्ण करून अभिकर्ता नेमणूक झाली आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात चालू हंगामात नैसर्गिक संकटामुळे मासेमारी व्यवसायावर विपरित परिणाम झाला असल्याबाबत

**(८) ६७९९५ (२४-०८-२०२३) . श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू हंगामात नैसर्गिक संकटामुळे (अचानक वातावरणात झालेल्या बदलामुळे) मासेमारी व्यवसायावर विपरित परिणाम होऊन मच्छिमारांवर आर्थिक संकट आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, ते मे, हा तीन महिन्याचा कालावधी मासेमारीसाठी महत्वाचा असतांना यावर्षी अचानक वातावरणात झालेल्या बदलामुळे मच्छिमार आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा, आर्थिक सहाय्य, कर्ज माफी अशाप्रकारचे मच्छिमार समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डाला आर्थिक बळ देण्याबाबतचे आश्वासन दिनांक २६ ऑक्टोबर २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत तत्कालीन मंत्री, वित्त व नियोजन यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून मच्छिमारांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०१-२०२४) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ या वर्षी माहे ऑगस्ट २०२२ व सप्टेंबर २०२२ या कालावधीत कोकण विभागातील सागरी जिल्हयामध्ये झालेली अतिवृष्टी/ मुसळधार पाऊस, खराब वातावरणामुळे तसेच हवामान खात्याकडून प्राप्त संदेशानुसार मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नसून सदर कालावधीत हवामान खात्याच्या सतर्कतेच्या इशाऱ्यामुळे काही मासेमारी नौकांना मासेमारी न करताच परत यावे लागले आहे. त्यामुळे काही प्रमाणात नुकसान झालेले आहे.

(३) व (४)

मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा, आर्थिक सहाय्य, कर्ज माफी अशा प्रकारचे मच्छिमार समाजाचे विविध प्रश्न सोडविण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अप्रमाणित कृषी निविष्ठेबाबतच्या खटल्यांसाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याबाबत

**(९) ६८०२५ (२७-०८-२०२३) . श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अप्रमाणित निविष्ठा (बी-बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके) आढळल्यास संबंधित कंपनी व विक्रेत्यांविरुध्द खटले दाखल करण्यात येऊन ते निकाली काढण्यासाठी ५ ते १० वर्षे लागत असल्याने शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, हे खरे आहे काय,

वि.स. २३७ (7)

(२) असल्यास, यासंदर्भात खटले निकाली काढण्यासाठी शीघ्र कृषी न्यायालय (फास्ट ट्रॅक कोर्ट) स्थापन करण्याची मागणी शासनाकडे केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात अप्रमाणित निविष्ठा (बी-बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके) मुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार होऊ नये तसेच अप्रमाणित निविष्ठा विकणारे विक्रेते व कंपन्या यांच्यावर जरब बसावी यासाठी अत्यावश्यक वस्तु कायदा, १९५५, बियाणे कायदा, १९६६, किटकनाशके कायदा, १९६८, महाराष्ट्र विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ या कायद्यांमध्ये सुधारणा करण्याकरीता व महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसारनभरपाई देण्यासाठी अधिनिमय, २०२३ अशी ५ नवीन विधेयके दिनांक ०४.०८.२०२३ रोजी विधानमंडळाच्या सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधानसभा व विधानपरिषदेच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर मा.मंत्री (कृषि) यांनी सादर केलेली आहेत. सदर विधेयके विधीमंडळाच्या संयुक्त समितीच्या विचारार्थ राखीव ठेवण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवतनाही

---

## सातारा जिल्ह्यातील कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१०) ६९३१७ (०४-०९-२०२३) . श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन गत ६० वर्षांपासून झाले नसून पुनर्वसन करण्यासाठी शासनाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात १८१ आणि मुरबाड तालुक्यात ११३ हेक्टर जमीन धरणग्रस्तांना वाटप करण्यासाठी ठेवण्यात आली असून सदरच्या जमिनीचे वाटप झाले नसल्याचे १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरणग्रस्तांना अद्याप जमिनीचे वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून धरणग्रस्तांना जमिनीचे तातडीने वाटप करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१९-०१-२०२४) :** (१) ठाणे जिल्हयात एकुण ४६६ कोयना प्रकल्पग्रस्तांना शेतजमिनीचे वाटप झालेले आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे पिंपरी, गोठेघर, डायघर, भंडार्ली व वालिवली येथे पर्यायी जमिनी राखीव आहे.

(२ व) (३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोयना व तत्सम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पर्यायी जमिन वाटप प्रकरणांची तपासणी करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर करावयाचा आहे. त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) येथे शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुनही त्याठिकाणी प्रकल्प उभारण्यात न आल्याबाबत**

**(११) ६९८३० (२५-०८-२०२३) . श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मेढेखार काळवड खाडी परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांची सुमारे ७५० एकर जमीन शेतीवर आधारित उद्योग उभारण्याकरिता दहा कंपन्यांनी घेऊन १७ वर्षे उलटूनही तेथे कोणतेही उद्योगाचे बांधकाम अथवा उपक्रम सुरु झाले नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांनी जमीन परत मिळण्याकरिता रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संपादित केलेली जमीन बांधकाम न केल्यामुळे नापिक होण्याची भिती असून तेथे कांदळवळ देखील निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संपादित केलेल्या जमीनीवर उद्योग उभारून रोजगार निर्मिती करण्याबाबत अन्यथा शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०३-२०२४) :** (१) अलिबाग तालुक्यातील मेढेखार, काळवड खाडीतील ११४-३०-१० हे.आर जमिन विविध कंपन्यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ६३ व ६३ एक-अ अन्वये खरेदीखताद्वारे खरेदी केलेल्या आहेत. सदर जमिनीवर अद्यापपर्यंत कोणतेही उदयोग उभारले नसल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी मोर्चा काढला.

(२) सदर जमिनी या शासनाने संपादीत केलेल्या नसुन खाजगी कंपन्यांनी परस्पर शेतकऱ्यांकडून विकत घेतल्या आहेत. त्या जमिनींचा अद्यापपर्यंत वापर सुरु केलेला नाही. सदरच्या जमिनी पड व ओसाड असून, खाडीकिनारी असलेल्या काही जागेत कांदळवन निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

(३) मे.पटनी एनर्जी प्रा.लि. या कंपनीने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३एक-अ नुसार खरेदी केलेल्या जमिनींबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी शर्तभंगानुषंगाने सुनावणी घेऊन दिनांक १२/०१/२०२३ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द कंपनीने महसूल न्यायाधिकरण, मुंबई येथे दावा दाखल केला आहे. तसेच, इतर कंपन्यांनी खरेदी केलेल्या जमिनींबाबत शर्तभंग केल्याप्रकरणी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार सुनावणीची प्रक्रीया सुरु केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कोळे (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे तुळजाभवानी को. हौ.सो. मधील सहकारी संस्थेची चौकशी करण्याबाबत**

**(१२) ७००८१ (२४-०८-२०२३) . श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोळे (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे तुळजाभवानी को. हौ.सो. मधील सहकारी संस्थेचे एकूण १०० सभासद असून प्रवर्तकाने त्यापैकी ५३ सभासदांची रजिस्टरकडे चुकीच्या दस्तऐवजाची नोंदणी करुन ४७ सभासदांना वगळून त्यांची नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणी न केल्याबाबत वगळलेल्या सभासदांनी उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण यांचेकडे वारंवार तक्रारी करुनही उपनिबंधकांनी कार्यवाही न केल्याने उक्त सभासदांनी वकिलामार्फत उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण यांचेकडे दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उपनिबंधकांनी अद्यापही कार्यवाही न करण्याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत सहकारी संस्थेची चौकशी करुन वगळलेल्या सभासदांना सभासद करुन घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

वि.स. २३७ (9)

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१४-०३-२०२४) :** (१) नाही. सदर संस्था नोंदणीचे वेळी प्रस्तावात ५३ प्रवर्तक सभासद सामील होते. त्यानुसार दिनांक २४/१०/२००८ रोजी संस्थेची नोंदणी केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

(२) दिनांक ०३/११/२०२२ रोजी अर्जदार श्री.मोहन दत्तू गलांडे व इतर चार यांनी ॲड.समीर तोंडापुरकर यांचेमार्फत केलेली तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचे कार्यालयामार्फत उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली या कार्यालयास दिनांक ०४/०१/२०२३ रोजी प्राप्त झाली आहे. त्यावर दिनांक १८/०१/२०२३ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली कार्यालयाकडून सदर तक्रारदार यांना नमूद संस्थेचे सभासदत्व प्राप्त होणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम २२/२३ नुसार अर्ज/अपील दाखल करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) भाग (२) प्रमाणे.

(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ऊस तोडणी यंत्रासाठी अनुदान मिळण्याबाबत**

**(१३) ७०१०८ (२९-०८-२०२३) . श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२-२३ मध्ये ४५० यंत्रे व सन २०२३-२४ मध्ये ४५० यंत्रे मिळून दोन वर्षात सुमारे ९०० ऊस तोडणी यंत्राची उपलब्धता करण्याचे उद्दीष्ट राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी अनुदान देण्याबाबतची योजना राबविण्यास शासनाने मंजूरी दिली असून ४० टक्के वा ३५ लाख रुपयांपैकी जी रक्कम कमी असेल इतक्या रकमे इतके अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असलेले वितरण हे नवीन मशीननी वितरित होणार याची माहिती मिळणे कठीण झाल्याने ज्यांच्यामार्फत अनुदान दिले जाणार आहे, त्या कृषी विभागाला अद्याप काहीच माहित नसून विशेष म्हणजे यंत्रमालकाचे ये-जा करण्यातच दिवस गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे हे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-०२-२०२४) :**(१) व (२) होय

(३) व (४)

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्रास अनुदान प्रकल्पाबाबत सन-२०२३-२४ या आर्थिक वर्षात ४५० ऊस तोडणी यंत्रांकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी मुंबई यांचेशी समन्वय साधून महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जाची राज्यस्तरावर संगणकीय सोडत काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक २८/१२/२०२३ च्या पत्राने कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील श्री. स्वामी जगद्गुरू शंकराचार्य, करवीर पिठ देवसस्थानची जमीन परस्पर हस्तांतरीत केल्याबाबत**

**(१४) ७०३४८ (३१-०८-२०२३) . श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोनोली तर्फ आसनडोली या श्री. स्वामी जगद्गुरू शंकराचार्य करवीर

पिठांच्या संस्थांना दान देण्यात आलेल्या जमिनीपैकी २५९ एकर जमीन देवस्थान संस्थानाने वहिवाट करण्यासाठी दिलेल्या २०० हून अधिक शेतकऱ्यांकडून मुखत्यार पत्र (पॉवर ऑफ अँटॉर्नी) घेऊन तलाठी, तहसिलदार यांच्याकडून संस्थांची परवानगी न घेता बेकायदेशीरपणे लोकप्रतिनिधींनी जमीन काबीज करण्याचा प्रयत्न करुन मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करवीर पीठ संस्थांनी या संदर्भात मा.न्यायालयात दावा दाखल केला असता, मा.न्यायालयाने दिलेला निर्णय तसेच १९९६ साली राज्य शासनाने सदरहू जमीनी वहिवाट करणाऱ्या शेतकऱ्यांची नावे रद्द करुन देवसस्थान संस्थांना हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने निर्णय जारी करुनही त्याचे पालन न झाल्यामुळे सन १९९६,२०१० व २०१८ या कालावधीत तीन शासन निर्णय जारी करण्यात येऊनही शासनाच्या महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय व शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सन २०१० मध्ये देवसस्थानच्या जमिनी बेकायदा हस्तांतरीत झाल्याचे तत्कालीन महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी मान्य करुन याबाबत संबंधितांना चौकशीचे आदेश देण्यात येऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०२-२०२४) :** (१) ,(२) ,(३) व (४) हे खरे नाही.

अर्धन्यायीक कामकाजामधून राधानगरी तालुकेतील कोनोली तर्फ असंडोली मधील जमीनी श्री.स्वामी जगद्गुरु शंकराचार्य करवीर पिठाच्या आहेत किंवा नाहीत याविषयी मा.राज्य मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी दिले आदेशास अनुसरुन मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील क्र.देवस्थान/ आरआर/ ३११/२०११, दिनांक ३१.०५.२०१२ अन्वये "सदर जमीन ही देवस्थान इनाम जमीन नसून रयतावा संवर्गातील आहेत असे आदेशीत करण्यात येते" असा आदेश दिलेला आहे. मा.राज्य मंत्री महसूल महाराष्ट्र राज्य यांच्या न्यायालयात क्र. डीईव्ही- ०८१४/प्र.क्र.२९४/ल- ४ मध्ये दिनांक ०६.०९.२०१४ अन्वये दिलेल्या आदेशामध्ये मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचा आदेश कायम केलेला आहे. सद्यस्थितीत या जमीनीबाबत उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र. १०७९२/२०१४ दाखल केले असून त्यामध्ये रिट पिटीशन चालू असे पर्यंत फेरफार क्र.२२२ रद्द करणेबाबत कोणतीही कार्यवाही करणेस मनाई केलेली आहे. सबब कोतोली तर्फे असंडोली येथील जमीनीबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच सदर जमिनींच्याखरेदी विक्री/हस्तांतरणबाबत झालेल्या फेरफार विरुद्ध मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे श्री.स्वामी जगदगुरू शंकराचार्य पीठ करवीर यांनी अपील दाखल केले असून ते प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत व जामखेड या तालुक्यातील मातोश्री ग्राम समृद्ध शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत मंजूर कामांची स्थगिती उठवून निधी वितरित करण्याबाबत

**(१५) ७०५९६ (११-०९-२०२३) . श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) या तालुक्यातील शेत पाणंद रस्त्यांच्या कामांना दिनांक २९ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही तालुक्यातील कामांना जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णयाच्या आदेशान्वये मंजूर असलेल्या कामांपैकी कामांना सुरुवात देखील झाली नसताना सुरु न झालेल्या कामांमध्ये गैरप्रकार व चौकशी सुरु असल्याचे सांगून स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी स्थगित केलेले मातोश्री ग्राम समृद्ध शेत पाणंद रस्त्यांची कामे सुरु करुन सदरच्या कामांना

निधी वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर कामांना गट विकास अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) कामांना स्थगिती असल्याने निधी वितरणाची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील काजळी सहकारी सामुदायिक कृषी संस्थेच्या सहकार खात्यामार्फत संस्था हस्तांतरण करताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) ७०७४५ (२७-०८-२०२३) . श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील काजळी सहकारी सामुदायिक कृषी संस्थेच्या सहकार खात्यामार्फत संस्थेचे हस्तांतरण करताना गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काजळी सहकारी सामुदायिक कृषी संस्थेस आदिवासी नागरिकांची जमीन वाटप केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार दोषी आढळणाऱ्या संस्थेवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०७-१२-२०२३) :** (१) होय, हे अशतः खरे आहे.

(२) सदर संस्थेचे दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ अखेरचे लेखापरिक्षण झालेले असून लेखापरिक्षण अहवालाच्या नोंदी वरुन असे दिसून येते की, काजळी सहकारी सामुदायिक शेती सहकारी संस्था मर्यादित, काजळी पो. आच्छाड, ता. तलासरी जि. पालघर संस्थेस आदिवासी नागरीकाची जमिन वाटप केली असल्याचे दिसुन येत नाही.

(३) पालघर जिल्हयातील तलासरी तालुक्यातील काजळी सामुदायिक शेती सहकारी संस्था मर्या. काजळी, पो. आच्छाड, ता. तलासरी (अवसायनात) ही संस्था सहाय्य निबंधक, सहकारी संस्था डहाणू यानी कार्यालयाने दिनांक ११/०५/२०२१ रोजी अवसायनात घेऊन संस्थेवर शासकीय अवसायकाची नेमणूक केलेली आहे.

संस्था अवसायनात घेण्यापूर्वी संस्थेचे तत्कालीन अधिकृत पदाधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात सहकार खात्याची कुठलीही पूर्व परवानगी न घेता मे. परफेक्ट असोसिएट्स, कांदीवली (प.), मुंबई यांचेशी दिनांक ११/०४/२०१९ रोजी नोटरीद्वारे डीड ऑफ कनव्हेन्स केलेले होते. एक जनरल कुलमुखत्यारपत्र दिनांक ०५/०५/२०१९ रोजी दिलेले आहे. संस्थेच्या जमिन विक्री व्यवहारातून संस्थेच्या बँक खात्यात जमा झालेली रक्कम रु.७० लाख संस्थेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांची उर्जा ग्लोबल ट्रेडींग यांना त्यांच्या अधिकारात वर्ग केलेली आहे. त्यामुळे संस्थेचे अवसायक यांनी दिनांक ०८/०७/२०२३ रोजी मा. पोलिस उपअधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पालघर येथे संस्थेच्या तत्कालीन अधिकृत पदाधिकाऱ्यांची वर नमूद केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या संदर्भात सविस्तर तपास करणेकामी लेखी तक्रार दाखल केलेली आहे. आर्थिक गुन्हा शाखेकडील तपासानुसार व लेखापरीक्षण करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरूर (जि. पुणे) तालुक्यातील वाटप झालेल्या पुनर्वसन जमिनीची माहिती उपलब्ध नसल्याबाबत

**(१७) ७०८०१ (३१-०८-२०२३) . ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील वाटप झालेल्या पुनर्वसन जमिनीची माहिती मिळणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त, पुणे व अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांना माहे जून, २०२३ अखेरपर्यंत १४ स्मरणपत्रे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन यांनी दिनांक ६ डिसेंबर, २०२१ च्या पत्रानुसार शिरुर तालुक्यात चासकमान, आरळा कलमोडी, थिटेवाडी, विर, गुंजवणी, मळवंडी टुले इत्यादी प्रकल्पग्रस्तांना वेळोवेळी पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेले असून सदरची माहिती सद्य:स्थितीत तयार स्वरुपाची नाही अशा आशयाचे लेखी उत्तर दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसन विभागाकडून हवी असलेली माहिती सर्व यंत्रणांकडून संकलित करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल असे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दीड वर्ष होऊनही शिरुर तालुक्यातील वाटप झालेल्या पुनर्वसन जमिनीची व इतर लेखी स्वरुपात मागितलेली माहिती उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय ?

(५) असल्यास, सबंधित विभागाकडून माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१९-०१-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सन्माननीय वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या १ ते ८ मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ व ८ बाबतची माहीती तात्काळ सादर करणेबाबत संबधित अधिकारी यांना कळविण्यात आले असुन सदर मुद्दे वगळुन उर्वरीत मुद्यांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक ०६.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड मंडळांतर्गत मंडळ अधिकारी यांच्याकडून होत असलेल्या व झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(१८) ७१५८१ (१५-०९-२०२३) . श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड मंडळाअंतर्गत माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान श्री.सचिन सानप हे मंडळ अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या अंतर्गत असलेले सज्जे पिंगळे तरफ, बलगुजर तरफ, खोड तरफ या ठिकाणी देखिल हेच मंडळ अधिकारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०२१ ते जुलै, २०२३ या कालावधीमध्ये उक्त मंडळ अधिकारी व तलाठी यांनी मोठ्या प्रमाणावर फेरफार प्रकरणामध्ये अफरा-तफर केल्याच्या तक्रारी पुर्वी व आज देखिल शासन दप्तरी प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरफार नं.३०५० सर्व्हे नं.१५० अ मौजे वासनवाडी येथे २९ गुंठे फेरफारमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता केलेली आहे, तसेच मंडळ व त्याअंतर्गत असलेले सज्जे येथील मे २०२१ ते जुलै २०२३ या कालावधीमध्ये झालेल्या खरेदी खताची, त्यावर झालेल्या फेरफारची संचिकानिहाय चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मंडळ अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर फेरफार प्रकरणामध्ये अनियमितता, मुरूम उत्खननासाठी कंत्राटदार, खड्डी क्रेशर चालक व नागरिकांकडून अपसंपदा जमा करत आर्थिक फायदा करून घेतला असून महसूल

संबंधित सर्व विषयात संबंधितांनी करोडो रूपयांची आर्थिक उलाढाल केलेली असून याद्वारे शासनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
माहे मे, २०२१ ते जुलै, २०२३ या कालावधीमध्ये एकूण ०४ तक्रारी प्राप्त असून, त्यापैकी ०३ तक्रारी ह्या प्रामुख्याने फेरफार क्र.३०५० च्या अनुषंगाने आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
फेरफार नं.३०५० सर्व्हे नं.१५० अ, मौजे वासनवाडी, ता.जि. बीड येथील बोगस फेरफाराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी बीड यांचेकडे चौकशी सुरू आहे.
(४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे. सदर तक्रारींची चौकशी अपर जिल्हाधिकारी बीड व उपविभागीय अधिकारी बीड यांचेकडे सुरू आहे.
(५) माहे मे, २०२१ ते जुलै, २०२३ या कालावधीमध्ये एकूण ०४ तक्रारी प्राप्त आहेत.
१. तत्कालीन विधान परिषद सदस्य यांनी फेरफार व इतर बाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, प्रकरणी उपविभागीय अधिकारी बीड यांनी चौकशी करून सादर केलेल्या अहवालानुसार तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले असून, कुठेही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यानुसार सदर तक्रार निकाली काढून तसे तत्कालीन विधान परिषद यांना कळविण्यात आले आहे.
२. उर्वरित ०३ तक्रारी ह्या प्रामुख्याने फेरफार क्र.३०५० च्या अनुषंगाने असून, त्यापैकी ०२ तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी बीड यांचेकडे चौकशी आहे. तसेच ०१ तक्रारीवर उपविभागीय अधिकारी बीड यांचेकडे चौकशी सुरू आहे. परंतु अद्यापपावेतो ०३ तक्रारींबाबचा अहवाल अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिकच्या शिक्षण संस्थेला नागपूर येथील ४२ एकर जागा नाममात्र शुल्कामध्ये देण्यात आली असल्याबाबत**

**(१९) ७१६५६ (१०-०२-२०२(४). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटीमार्फत भोसला मिलिटरी स्कूल चालवली जात असून याच संस्थेमार्फत नागपूरच्या चक्कीखापा भागात भारतीय प्रशासनिक सेवा पुर्वतयारी प्रशिक्षण वर्ग आणि निवासी सुविधेसह वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात येणार असून या करीता दिनांक १९ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ४२ एकर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती दिनांक २२ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेला शैक्षणिक प्रयोजनार्थ नागपूरच्या चक्कीखापा येथील १२ हेक्टर म्हणजेच ३० एकर जागा यापुर्वीच देण्यात आली असतांना या जागेला लागुन असलेली आणखी २१.१९ हेक्टर म्हणजेच ५२ एकर जागेची मागणी संस्थेने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सरकारकडे केली असता त्यानुसार या संस्थेला अतिविशिष्ट गुणवत्ताधारक आणि ख्यातनाम संस्था म्हणून शासनाच्या अधिकारात १० एकर जमीन ३० वर्षाच्या भाडेपटटयाने देण्याचा निर्णय मंत्रिमडळाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल व वित्त विभागाने या संसथेला १० एकरच जागा देण्यात यावी अशी शिफारस केल्यानंतर सुध्दा राज्य शासनाने ४२ एकर जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०३-२०२४) :**(१) व (२) दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत, भोसला मिलीटरी स्कूल, नागपूर यांना शासन निर्णय महसूल विभाग दिनांक २५.०७.२०१९ च्या परिच्छेद क्र.९ मधील तरतुदीनुसार अतिविशिष्ट गुणवत्ताधारक, ख्यातनाम व्यक्ती/ संस्था म्हणून ग्राहय धरण्यास मान्यता देवून, मौजा चक्कीखापा, प.ह.नं. १२ ता.नागपूर (ग्रामीण), जि.नागपूर येथील स.क्र.६४/१ मधील ५० (२१.१९ हे.आर) एकर शासकीय पहाड खडक जमीन भोसला मिलीटरी स्कूल,नागपूर यांना भारतीय प्रशासनिक पूर्वसेवा तयारी प्रशिक्षण वर्ग रहिवाशी सुविधेसह व त्यासोबत संलग्न वरिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यासाठीच्या प्रयोजनाकरीता मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) मा.मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उपरोक्त प्रमाणे अर्जदार संस्थेस जागा देण्याची कार्यवाही करण्यात आली.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे (जि.धुळे) तालुक्यातील सोनगीर, दापुरा व दापुरी येथील बोरविहीर ते नरडाणा रेल्वे मार्गाच्या प्रकल्पबाधितांना योग्य मोबदला मिळण्याबाबत

**(२०) ७१८८७ (०८-०२-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील सोनगीर, दापुरा व दापुरी येथील बोरविहीर ते नरडाणा रेल्वे मार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू असून जमिनीच्या अंतिम निवाड्यात शेतकऱ्यांना दुरुस्ती करून मिळत नसल्याने तेथील शेतकऱ्यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रेल्वे प्रकल्पांतर्गत जाणाऱ्या जमिनधारकांना शासनाकडून अत्यंत कमी मोबदला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना शासनाने योग्य मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) बोरविहीर ते नरडाणा रेल्वे मार्गासाठी धुळे तालुक्यातील सोनगीर, दापुरा व दापुरी येथील जमीनीचे भूसंपादन करणेकामी, केंद्र सरकारचा रेल्वे अधिनियम १९८९ व रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ मधील तरतुदींनुसार करण्यात येत आहे. जमीन धारकांना नियमानुसार योग्य तो मोबदला रक्कम निश्चीत करुन अंतिम निवाडे भूसंपादन अधिकारी यांच्याकडून जाहीर करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डहाणू (जि. पालघर) तालुक्यातील कोर्ट फि स्टॅम्प व स्टॅम्प पेपरचा होत असलेला काळाबाजार

**(२१) ७१९६९ (११-०२-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय

वि.स. २३७ (15)

**महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील विविध गावातील शासकीय कार्यालयांशी निगडीत प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र व ॲफेडेव्हिट इ. शासकीय कामकाजासाठी आवश्यक असलेल्या कोर्ट फी स्टॅम्प व स्टॅम्प पेपर मुद्रांक विक्रेत्यांकडे उपलब्ध होत नसल्याने गोरगरीब आदिवासी जनतेबरोबर शाळकरी विद्यार्थी व सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र, बँक, सिलेंडर, रेशनकार्ड भाडोत्रीचे करारपत्र, जातीचा दाखला, घरकुल प्रतिज्ञापत्र, उत्पन्नाचा दाखला व खरेदी विक्री दस्तावेज नोंदणी इ. च्या कामांसाठी आवश्यक असलेली स्टॅम्प पेपरची काळया बाजारात विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात स्टॅम्प पेपर वेळेवर मिळत नसल्याने लाभार्थ्यांना नाईलाजाने पालघर व वसई येथून आणावे लागते व ते आणूनही देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०३-२०२४) :** (१) ,(२) हे खरे नाही.

(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक मुद्रांक-२००४/१६३६/प्र.क्र.४३६/म-१ दिनांक ०१.०७.२००४ नुसार जात प्रमाणपत्र / उत्पन्न प्रमाणपत्र / वास्तव्य प्रमाणपत्र / राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तसेच शासकीय कार्यालये व न्यायालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ४ अन्वये आकारण्यायोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना याकरिता मुद्रांक शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

डहाणू तालुक्यासाठी सध्या तीन मुद्रांक विक्रेते असुन त्यापैकी दोन मुद्रांक विक्रेते तहसिल कार्यालयात व एक मुद्रांक विक्रेता मसोली गावात मुद्रांक विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यापैकी दुय्यम निबंधक डहाणू यांचे अहवालानुसार श्री.सुर्यकांत नारायण मेहेर, मुद्रांक विक्रेता यांचे कामकाजात अनियमितता आढळल्याने त्यांचा मुद्रांक विक्री परवाना तात्पुरता निलंबित केलेला आहे.

तसेच, श्री.रामदास हरिशचंद्र तांडेल, मुद्रांक विक्रता हे दिनांक १३.१०.२०२३ रोजी मुद्रांक विक्रीच्या ठिकाणी गैरहजर असल्याचे यांना त्याबाबत समज दिली आहे.

जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर व उपकोषागार अधिकारी, डहाणू कार्यालयांशी मुद्रांक जिल्हाधिकारी पालघर यांनी संपर्क साधला असता दोन्ही स्तरांवर (पालघर जिल्हा व डहाणू तालुका) १००/- व ५००/- रुपयांचे स्टॅम्प पेपर बाबत कोणताही तुटवडा नसून कामे सुरळीतपणे चालू आहे. तसेच खरेदी विक्रीच्या दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी ऑनलाईन पध्दतीने ई प्रदान प्रणालीव्दारे GRAS (Government Receipt Accounting System) अभासी कोषागारात मुद्रांक शुल्क जमा करण्याची सुविधा नागरिकांसाठी उपलध्द करुन देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील दापचरी दुग्ध प्रकल्पातील कुटुंबांना सरकारने घरे सोडण्याची नोटीस दिल्याबाबत**

**(२२) ७२०१४ (११-०२-२०२४). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई आणि ठाणे सारख्या शहरांना मुबलक दुध पुरवठा व्हावा म्हणून डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दापचरी येथे दुध प्रकल्प उभारण्यास या भागातील शेतकऱ्यांची ६ हजार हेक्टर जमीन संपादित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प उभारण्यात आल्यानंतर इतरत्र दुधाचा पुरवठा करण्यासाठी याच भागात मागील ५० वर्षांपासून २०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना प्रत्येकी ०१ हेक्टर जमीन, घर व संकरित गायी देऊन त्यांचे वास्तव्य करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ५० वर्षानंतर या शेतकऱ्यांना त्यांना दिलेली घरे व जमीन १५ दिवसात खाली करण्याबाबतच्या नोटीसा देऊन त्यांच्यावर अन्याय करण्याचा निर्णय शासनाने घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्प डबघाईला आल्यामुळे त्या भागातील स्थायिक झालेल्या शेतकऱ्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०३-२०२४) :** (१) (२) (३) व (४)

महाराष्ट्र शासनामार्फत तत्कालिन ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील दापचरी येथे दुग्ध प्रकल्पाची स्थापना करण्यात आली. सदर प्रकल्पासाठी एकूण २६७७ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पात सलंग्न पध्दतीची १७० कृषिक्षेत्र व १०० गावठाण पद्धतीचे क्षेत्र उभारण्यात आली आहेत. प्रत्येक कृषिक्षेत्रावर ९० आर. जमिन वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

सदर क्षेत्र वाटप करतांना क्षेत्रधारकांना दुग्धव्यवसाय विभागामार्फत विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. उदा. घर, जनावरांसाठी गोठा, गुरांचा दवाखाना, पाणीपुरवठा आदी. सदर सोयीसुविधेपोटी शासन निर्णय दिनांक २.२.२००१ अन्वये भाडे आकारणी करण्यात येते. दापचरी येथील दुग्धव्यवसाय क्षेत्रधारकांकडे सदर सोयीसुविधेपोटी माहे २०२३ अखेर सुमारे ३.०० कोटी थकबाकी प्रलंबित आहे.

सदर थकबाकी अदा करण्याबाबत व ज्या क्षेत्रधारकांचा करारनामा संपुष्टात आला आहे, अशा क्षेत्रधारकांची जमीन ताब्यात घेण्याबाबत प्रकल्प अधिकारी, दापचरी यांच्यामार्फत दिनांक २५.८.२०२३ अन्वये संबंधितांना नोटीस देण्यात आली. शासनामार्फत देण्यात आलेल्या सोयीसुविधेपोटी क्षेत्रधारकांकडे प्रदीर्घ कालावधीपासून शासनाची थकबाकी प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवलापार (ता. रामटेक, जि. नागपूर) चे नवीन तालुक्यामध्ये रूपांतर करण्याबाबत.**

**(२३) ७२३४२ (०८-०२-२०२४). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवलापार (ता.रामटेक जि. नागपूर) येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित असून त्यामध्ये ७२ गावांचा समावेश असल्याने नवीन तालुक्यामध्ये रूपांतर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यांच्या विभाजनाच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त तालुका पुनर्रचना समितीला वारंवार मुदतवाढ देऊनही अद्यापही तालुका विभाजनाचे निकष ठरविण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०३-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) तालुका विभाजनासाठी सुधारीत निकष निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई

यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०३.२०२३ च्या शासन परिपत्रकान्वये तालुका पुनर्रचना समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास दिनांक २१.०२.२०२४ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून सदर अहवालाची शासनस्तरावर छाननी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मजास (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथील जमीन संपादन करण्याबाबत**

**(२४) ७३०९८ (०८-०२-२०२४). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मजास (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथील न.भू.क्र.२२७ (पै) ही जमीन संपादन करण्याबाबतची कार्यवाही करुन मंजूरीसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग यांच्याकडे मुल्यांकन छाननी करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त भूसंपादनाचा निवाडा लवकरात लवकर घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०३-२०२४) :** (१), (२) व (३) मौजे मजास (ता.अंधेरी, जि. मुंबई उपनगर) येथील न.भू.क्र.२२७ (पै) ही जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील प्रयोजनासाठी संपादन करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे चालु आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेतले आहे. त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी प्रारुप निवाड्यास मान्यता दिली असुन, निवाड्याच्या रक्कमेपैकी उर्वरित रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मागविली आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर अंतिम निवाडा घोषित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोथा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे निसर्ग परिचय केंद्राच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत**

**(२५) ७३२१५ (११-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोथा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा अभयारण्यांतर्गत वन्यजीव परिक्षेत्र हे पर्यटनासाठी महत्त्वाचे परिक्षेत्र आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभयारण्यात पर्यटन वाढीच्या दृष्टीने बोथा निसर्ग परिचय केंद्राकरीता निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पर्यटकांच्या सोयीसाठी व पर्यटन वाढीसाठी प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) निसर्ग परिचय केंद्राचे बळकटीकरण अंतर्गत कामांना जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मंजूरी मिळाली असून कामाची ई-निविदा करुन सदर कामे प्रगती पथावर आहेत. तसेच बोथा येथील निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील पुर संरक्षण भिंतीची कामे मंजूर करण्याबाबत

**(२६) ७३२१६ (०८-०२-२०२४). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावांमध्ये नदीकाठावरील गावांना वारंवार पुराचा धोका निर्माण होतो यामुळे वित्त व जिवीत हानी टाळण्याच्या दृष्टीने पुरसंरक्षक भिंत मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या गावातील पुरसंरक्षण भिंतीच्या कामांना आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाकडून मंजूरी घेऊन माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आपत्ती व्यवस्थापन (मदत व पुनर्वसन) विभाग यांच्याकडे जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या शिफारशीसह प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त व जिवीत हानी टाळण्याकरीता उपरोक्त प्रस्तावित पुरसंरक्षण भिंतीच्या कामांना मंजूरी देण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. अनिल पाटील (१९-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असुन प्रस्तावावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राऊतवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) तालुक्यातील ओढ्यांमधील पाण्याच्या प्रवाहामुळे गावातील घरांना धोका निर्माण झाल्याबाबत

**(२७) ७३२२० (१०-०२-२०२४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राऊतवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील आंगले वाडीतील ओढ्यांमधील पाण्याच्या प्रवाहामुळे ओढ्यालगतचा भाग कोसळत असल्यामुळे गावातील घरांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ओढ्यांना संरक्षण भिंत बांधणे व ओढ्यावर मो-या बांधणे यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी आगले ग्रामस्थांनी मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१९-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदन आवश्यक कार्यवाहीस्तव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जत, उमदी व संख (जि.सांगली) अशा तीन स्वतंत्र तालुक्यांची निर्मिती होण्याबाबत

**(२८) ७३३६८ (०८-०२-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक**

**(रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत, उमदी व संख (जि.सांगली) अशा तीन स्वतंत्र तालुक्यांची निर्मिती होण्याबाबत ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१) सांगली जिल्ह्यातील क्षेत्रफळाने व लोकसंख्येने प्रचंड मोठा असलेला तालुका जत, याचे जत, उमदी व संख असे त्रिभाजन होऊन उमदी हा स्वतंत्र तालुका होण्याबाबत स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनींचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

(२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०२.०३.२०२३ अन्वये राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने सुधारित निकष निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पुनर्रचना समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्रतिक्षेत आहे.

नवीन तालुका निर्मिती प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्याकरीता आर्थिक भार असून त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

तत्पुर्वी, सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याची वाढणारी लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ, झालेले नागरीकरण, दुष्काळग्रस्त भाग इ.बाबींमुळे जत तालुक्यातील तहसील कार्यालयावर कामाचा मोठा ताण पडत असल्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील संख येथे दिनांक १०.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र अपर तहसील कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे ओरी (जि.रत्नागिरी) येथील बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करुन संबंधित महसूल अधिका-यांच्या संगनमताने फसवणूक केल्याबाबत**

**(२९) ७३४३९ (११-०२-२०२४). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओरी (जि.रत्नागिरी) सर्व्हे नं ८७/०, १६६/२, १५५/१, १६२/१, १६२/१, २८५/२, २८५/४, २८६/५,२६१/११,१५३/१,१५४/२७,२८२/४,२८२/५,२८४/१२, या जमिनीच्या २७ कायदेशीर हिस्सेदार यांनी जमिनीचे एन.ए दिनांक ३/१२/१९९९ रोजी श्री.विजय बाबुराव देसाई व श्री.सुधाकर गोविंद देसाई यांना कधीही रदद न होणारे कुलमुखत्यार पत्र दिले असतांना दिनांक १६ ऑगस्ट, २००१ रोजी वा त्यासुमारास बनावट कुलमुखत्यारपत्र सादर करुन त्यांनी मिळकतीदार व हिस्सेदार यांच्या खोटया सहया करुन श्री.मनिष माणिकचंद मुणोत व श्री.मनोज माणिकचंद मुणोत यांना दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास जमिन विक्री केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक ३ डिसेंबर, १९९९ रोजी वा त्यासुमारास कुलमुखत्यापत्रातील मिळकतीदार व हिस्सेदारांची नावे दिनांक ६ ऑगस्ट, २००१ रोजीचे बनावट कुलमुखत्यापत्रामध्ये नमुद करुन सदरचे कुलमुखत्यार पत्र रदद केले नाही व लिहून देणा-या व्यक्तिपैकी काही व्यक्ती मयत असूनही कोणीही मयत झालेले नाही असे खोटे घोषणापत्र श्री.विजय बाबुराव देसाई यांनी खरेदीखताच्या प्रक्रियेमध्ये सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा जमिन विक्रीचा व्यवहार श्री.विजय बाबुराव देसाई व व त्यांचे साथीदार तसेच जमीन खरेदीदार श्री.मनिष मुनोत व श्री.मनोज मुनोत यांनी दुय्यम निबंधक, रत्नागिरी व संबंधित महसूल विभागाच्या अधिका-यांशी

संगनमत करुन केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खेर आह काय,

(४) असल्यास, दिनांक ३ डिसेंबर, १९९९ रोजी वा त्यासुमारास तयार करण्यात आलेल्या कुलमुखत्यार पत्रामध्ये मिळकतीमधील जमीन विकण्याबाबत कुठेही नोंद नसतांना मिळकतदार दिवंगत श्रीमती विमल देसाई या निरक्षर असतांना त्यांची स्वाक्षरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सह दुय्यम निबंधक वर्ग २ रत्नागिरी यांनी श्री.विजय बाबुराव देसाई व श्री.कुणाल, श्री.मोहन देसाई यांच्या नावाने फौजदारी दाखल करण्याबाबत पत्र केल्यानुसार दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त मिळकतीमधील मुळ हिस्सेदारांची बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करुन संबंधित महसूल अधिका-यांच्या संगनमताने श्री.विजय बाबुराव देसाई व इतर यांनी फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, दोषी श्री.विजय बाबुराव देसाई व त्यांचे साथीदार महसूल अधिकारी व कर्मचारी तसेच यास जबाबदार असणा-या संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (सुधारित) च १२० (बी) व ३४ आणि नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८१ व ८२ अंतर्गत गुन्हा दाखल करुन, कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दस्तऐवज क्र. २९७/२०१९ अन्वये मनिष माणिकचंद मुनोत व मनोज माणिकचंद मुनोत यांना दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी जमिन विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. मौजे ओरी (जि.रत्नागिरी) येथील ८७/०,१६६/२,१५५/१, १६२/१, १६२/१, २८५/२, २८५/४,२८६/५, २६१/११, १५३/१, १५४/२७, २८२/४,२८२/५, २८४/१२ या जमिनीच्या २७ कायदेशीर हिस्सेदार यांनी दिनांक ३/१२/१९९९ रोजी श्री विजय बाबुराव देसाई व श्री सुधाकर गोविंद देसाई यांना कधीही रदद न होणारे कुलमुखत्यारपत्राची प्रत दस्तऐवजाचा भाग केल्याचे दिसून येत नाही. तथापि १६/०८/२००१ रोजीचे मुखत्यारपत्राचे आधारे खरेदीखताचा दस्तऐवज क्र.२९७/२०१९ या दस्तऐवजामध्ये नमूद पक्षकाराचे नावे असलेली मुखत्यारपत्रे दस्तऐवजाचा भाग करण्यात आलेली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०३.१२.१९९९ चे कुलमुखत्यारपत्राची प्रत दस्तऐवज क्र. २९७/२०१९ मध्ये जोडण्यात आल्याचे दिसून येत नाही. तथापि दस्तऐवज क्र.४०४९/२०१९ दिनांक १०.०७.२०१९ व दस्तऐवज क्र. ४११३/२०१९ दिनांक १६.०७.२०१९ या मध्ये दिनांक १६.०८.२००१ रोजीचे कुलमुखत्यारपत्राबाबत खोटे घोषणापत्र श्री.विजय बाबुराव देसाई यांनी सादर केल्याचे आढळून आलेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

दिनांक ०३.१२.१९९९ रोजीचे मुखत्यारपत्र दस्तऐवजाचा भाग करण्यात आलेला नसून त्या मुखत्यारपत्राचे आधारे दस्तऐवज नोंदणी करण्यात आलेली नाही.

(५) व (६) होय, हे खरे आहे.

सह दुय्यम निबंधक वर्ग-२ रत्नागिरी या कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्तऐवज क्र. ४०४९/२०१९ व ४११३/२०१९ या दस्तऐवजामध्ये विमल रघुनाथ देसाई व सुनयना संजय पोतनीस यांचे निधन झालेले असतानाही दस्तऐवज नोंदणीचे वेळी घोषणापत्रात कुलमुखत्यारपत्र लिहून देणार पैकी कोणीही मयत झालेले नाही. अथवा कुलमुखत्यारपत्र रदद झालेले नाही असे खोटे घोषणापत्र दस्तासोबत सादर केल्याने नोंदणी अधिनियमाचे १९०८ चे कलम ८२ अन्वये चौकशी अंती कलम ८३ खाली विजय बाबूराव देसाई यांचेवर FIR क्र. ५०/२०२१ अन्वये दिनांक १८.०२.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(७) प्रश्न उदभवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) येथील १३ शेतकरी प्रोडयुसर गोदाम बांधकामाच्या अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) ७३४५७ (१३-०२-२०२४). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून राष्ट्रीय खाद्यतेल अभियान गळीत धान्य २०२३-२४ या वर्षासाठी शेतकरी प्रोड्युसर कंपनीस २५० मेट्रीक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी साडेबारा लाख अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त योजनेची माहिती तालुका कृषी अधिकारी यांना दिली असून सदर योजनेची माहिती वरिष्ठ कार्यालयाकडून तालुका कृषी अधिकारी यांना दिली नसल्याने सेलू (जि.परभणी) तालुक्यातील १३ शेतकरी प्रोड्युसर कंपनी या योजनेपासून वंचित राहिल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच वंचित शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१२-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. राष्ट्रीय खाद्यतेल अभियान योजनेतर्गंत परभणी जिल्ह्यासाठी एक व अन्न व पोषण सुरक्षा कडधान्य योजनेतर्गंत चार असे एकुण पाच भौतिक लक्षांक होते. त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, परभणी यांनी जिल्हा माहिती अधिकारी, परभणी व तालुका कृषि अधिकारी यांना दिनांक २६ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये गोदाम बांधकाम याबाबीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून अर्ज मागविण्याकरिता प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी कळविले होते, त्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील सात शेतकरी उत्पादक कंपन्यांकडुन अर्ज सादर करण्यात आले. लक्षांकानुसार पाच शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करुन पुर्व संमती देण्यात आली व दोन शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालाड (पश्चिम) मुंबई येथे शासनाने सार्वजनिक रुग्णालयाची जमीन विनामूल्य हस्तांतरीत करण्याबाबत**

**(३१) ७३६७६ (०८-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मढ, मार्वे रोड, मालाड (पश्चिम) मुंबई येथे शासनाने सार्वजनिक रुग्णालयासाठी तालुका अंधेरी येथील भूमापन क्र.१९७ च्या मिळकती पैकी काही जमीन विकास नियोजन आराखडा सन २०३४ नुसार रुग्णालयाकरीता जमीन आरक्षित ठेवली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या जमीन क्षेत्राचे विनामूल्य हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्यात यावे, या संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यासमवेत दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरक्षित ठेवलेल्या जमीन क्षेत्राचा ताबा तातडीने देण्यात यावा, अशी मागणी प्रमुख अभियंता (विकास नियोजन) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली असूनही विनामूल्य जमीन हस्तांतरण करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विनामूल्य जमीन क्षेत्राचे हस्तांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०३-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) मौजे मढ, ता. अंधेरी, न.भू.क्र.१९७ मधील २३३२.५० चौ.मी. जमीन सार्वजनिक रुग्णालयासाठी आरक्षित असल्याने नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांनी दिनांक २७/०७/२०२३ रोजी मुख्य अभियंता, (विकास नियोजन) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या आदेशानुसार सदर जमिनीचा आगाऊ ताबा दिलेला आहे.

सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ६(३) (अ) च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेस सार्वजनिक रुग्णालय उभारण्यासाठी भोगवटामूल्य वसूल करुन देण्यात यावी किंवा कसे, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०३/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने शासन पत्र, दिनांक ०७/०२/२०२४ अन्वये सदर जमीन बृहन्मुंबई महानगर पालिकेला विनामुल्य व महसूल मुक्त रितीने अटी व शर्तींच्या अधीन राहुन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ६(३) (अ) मधील तरतुदीप्रमाणे अंतिमत: बृहन्मुंबई महानगरपालिकेस कब्जेहक्काने मंजूर करावी असे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय मिळकत स्वत:ची भासवून मे. इंडिया फार्मस प्रा.लि. या कंपनीने महानगरपालिकेला कचरा टाकण्याची परवानगी दिल्याबाबत

**(३२) ७३६९१ (१०-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय मिळकत स्वत:ची भासवून मे. इंडिया फार्मसी प्रा.लि. या कंपनीने महानगरपालिकेला कचरा टाकण्याची परवानगी दिली त्यामुळे शासनाची ७०० कोटी रुपयाची फसवणूक झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीनीवर हजार ब्रास कच-याची विनापरवाना भरणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१) मौजे मार्वे येथील न.भू.क्र.१३१ व १३२ तसेच मोजे आक्से येथील न.भू.क्र.२, २/१२/२, २/१३, २/१४ या मिळकतींवर कचरा टाकण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा

विभागाने दिनांक ०३/१०/२०२२ रोजी परवानगी दिली होती. सदरची परवानगी कार्यकारी अभियंता (घ.क.व्य) परिमंडळ-४ यांनी दिनांक १२/०१/२०२३ रोजीच्या आदेशान्वये रद्द केली आहे.

(२), (३), (४) व (५) सदरहू मिळकतीचे तहसीलदार, बोरीवली यांनी दिनांक २४/११/२०२३ रोजी स्थळपाहणी केली. सदरच्या स्थळपाहणीत सदरहू ठिकाणी कचरा टाकून भरणी केल्याची बाब तहसीलदार, बोरीवली यांना आढळून आली नाही.

---

### मौजे नेहरुनगर , (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या गावाला महसूली दर्जा मिळण्याबाबत

**(३३) ७३९५४ (०८-०२-२०२४). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेहरुनगर, (ता.मोताळा,जि.बुलढाणा) या गावाला महसूली दर्जा मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व स्थानिकांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१) मौजे नेहरुनगर, ता.मोताळा, जि.बुलडाणा या गावाला महसुली दर्जा मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेले दिनांक १९.१२.२०२२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचा विभागीय आयुक्त, अमरावती यांचा दिनांक ०२.१२.२०२२ रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) शासन अधिसूचना क्र.टीएलसी-१०७६/६३९२३/म-६, दिनांक ०१.०७.१९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोटकलम (१) (सहा) मधील वाडी अथवा क्षेत्रास स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देण्यासंबंधीचे शासनाचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी,बुलडाणा हे निर्णय घेण्यास सक्षम असल्याने, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व निकष विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांना दिनांक २४.०७.२०२३ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ढाणकी नगरपंचायतीला अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाचा दर्जा देण्याबाबत

**(३४) ७४००८ (०८-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ढाणकी नगरपंचायतीला अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाचा दर्जा देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश कक्ष अधिकारी, महसून वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांनी दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०३-२०२४) :** (१) व (२) विद्यमान मा. विधानसभा सदस्य, उमरखेड- महागांव विधानसभा यांनी उमरखेड तालुक्यातील ढाणकी नगरपंचायतीला अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाचा दर्जा मिळण्याबाबतची विनंती शासनाकडे केली होती.

वि.स. २३७ (24)

महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, तालुक्यातील दूरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्याच्या तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सखोल तपासणी करून स्वयंस्पष्ट व परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत सर्व विभागीय आयुक्त यांना विभागाच्या दिनांक १९.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने मा. विधानसभा सदस्य यांनी केलेल्या मागणीनुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांना विभागाच्या दिनांक १९.१२.२०२२ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी असे दिनांक २४.०४.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

त्यानुसार विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांच्या दिनांक ०५.०७.२०२३ च्या पत्रान्वये अपर तहसिलदार कार्यालय, ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ हे कार्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि, विभागाच्या दिनांक २५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल/नवीन कार्यालय निर्मिती व महसुली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या कार्यकक्षेत तालुक्यांतील प्रशासकीय कामकाजाचे स्वरूप विचारात घेऊन आवश्यकतेनुसार अपर तहसील कार्यालय निर्मीती, त्याकरीता आवश्यक पद निर्मिती, आवर्ती व अनावर्ती खर्चाचा तपशील तसेच इतर अनुषंगिक बाबी यांसह शिफारस करणे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर राज्यात अपर तहसील कार्यालये स्थापन करण्याबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे देवसरी ( ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पूरबाधित कुटुंबाच्या पुनर्वसनाच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(३५) ७४०१० (१०-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पूरबाधित ९९ कुटुंबाचा अंशतः पुनर्वसनाचा सुधारित प्रस्तावास निधी मंजूर करून प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांना माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार प्रधान सचिव, मदत व पुनर्सवन विभाग यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०४-०३-२०२४) :** (१) व (२) मौजे देवसरी, ता. उमरखेड जि. यवतमाळ येथील सन २००६ च्या अतिवृष्टीमुळे अंशत: बाधित झालेल्या २६६ कुटुंबांचे पुनर्वसन मौजे आंबवण ता. उमरखेड जि. यवतमाळ येथे करण्यास दिनांक ०३.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महागाव (जि.यवतमाळ) येथील कृषि केंद्र विभाग बंद करण्याच्या मागणीबाबत**

**(३६) ७४०२३ (११-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) येथील कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना कोणतेही मार्गदर्शन न करता कृषी केंद्रातून मनमानी पध्दतीने खत, बियाणे, औषधांची आणि त्यातही बिना पावतीने विक्री केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी अधिकारी व सहायक यांना मार्गदर्शनाकरिता शेतकऱ्यांनी फोन केला असता फोन न उचलता

तालुका कृषी कार्यालयाचे अधिकारी कृषी केंद्रावर तपासणीऐवजी विशिष्ट तारखेलाच आढळून येत असल्याचेही माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे तेथील शेतकऱ्यांनी उक्त विभाग बंद करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. तालुका, जिल्हा व विभागस्तरावर शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कंझार (ता.खामगाव) शिवारातील बनावट दस्तऐवजावरुन शेतीची खरेदी विक्री करुन फसवणूक केल्याबाबत**

**(३७) ७४४३० (०९-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कंझार (ता.खामगाव) शिवारातील शेत गट नं. २३३ मधील ३ हेक्टर २ आर पैकी २ हेक्टर ४२ आर शेत एका शेतकऱ्याच्या मालकीचे असताना दुसऱ्या इसमाने तिसऱ्याच्याच नावाने खरेदी केले असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मुक्त्यारपत्रावर साक्षीदार म्हणून बनावट स्वाक्षऱ्या केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०३-२०२४) :** (१) , (२) , हे खरे नाही.

तथापि दुय्यम निबंधक श्रेणी-१, खामगांव क्र.१, यांनी त्यांचे अभिलेखाचा शोध घेतला असता सन २०१५ मध्ये मौजे कंझारा, गट नंबर २२३ क्षेत्र ३ हे ०२ असा पैकी २ हे ४२ आर या मिळकतीचे खरेदीखताचा दस्त क्रमांक ८९२/२०१५ वर नोंदणी झाल्याचे दिसून येत आहे.

सदर खरेदीखताची नोंदणी अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार झाली आहे.

(३) विषयांकित मिळकतीचे खरेदीखत दस्त क्र.८९२/२०१५ व मुखत्यारपत्र दस्त क्रमांक ८०२/२०१४ या दोन्ही दस्ताबाबत अमरावती विभागाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**छत्रपती संभाजीनगर महसुल विभागात विभागीय आयुक्ताची परवानगी न घेता अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या केल्याबाबत.**

**(३८) ७४७०५ (०८-०२-२०२४). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २३७ (26)

(१) छत्रपती संभाजीनगर येथील महसुल विभागात विभागीय आयुक्ताची परवानगी न घेता वर्ग ३ च्या २०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या केल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून प्रतिनियुक्त्या करणा-या अधिका-याविरूद्ध कोणती कारवाई तसेच कर्मचा-यांना मुळ ठिकाणच्या पदस्थापनेवर पाठवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील अधिनस्त जिल्हाधिकारी कार्यालय तसेच त्यांचे अधिनस्त कार्यालयाच्या स्तरावर एकूण ७३ वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या त्यांचेकडील नियमित कामकाजाव्यतिरिक्त इतर कामाकरिता सेवा वर्ग करण्यात आल्या आहेत.

(२) वर्ग-३ कर्मचारी यांचे नियुक्ती प्राधिकारी हे जिल्हाधिकारी आहेत. जिल्हास्तरावर प्रशासनाची निकड तसेच कर्मचारी यांची विनंती विचारात घेवून कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी एकूण ७३ वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या त्यांचेकडील नियमित कामकाजाव्यतिरिक्त इतर कामाकरिता सेवा वर्ग करण्यात आल्या आहेत. सदरची बाब महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीशी विसंगत असल्याने सदर कर्मचाऱ्यांच्या वर्ग केलेल्या सेवा त्वरीत रद्द करणेबाबत शासन पत्र दिनांक ०१.१२.२०२३ अन्वये विभागीय आयुक्त यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुरंदर (जि.पुणे) येथील झेंडू उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३९) ७६२०८ (११-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) येथे अति उन्हामुळे व पाण्याअभावी झेंडू फूलाचे नुकसान होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने या नुकसानीचे पंचनामे केले आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार येथील झेंडू अत्यावश्यक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (११-०३-२०२४) :**(1) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३)

महसूल वन विभाग शा.नि क्र एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७,दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये पुरंदर तालुक्यात गंभीर स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पहुरजिरा (ता.शेगाव, जि.बुलढाणा) येथील परिसरात बोगस कंपनीच्या नावाने रासायनिक खते व किटक नाशक औषधांची विक्री झाल्याबाबत**

**(४०) ७६२७९ (१३-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहुरजिरा (ता.शेगाव, जि.बुलढाणा) येथील परिसरात बोगस कंपनीच्या नावाने रासायनिक खते व कीटकनाशक औषधे बनवून विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येत असल्याची घटना दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेगांव कृषी विभाग व पथक (जलंब पोस्टे अंतर्गत) पोलीसांनी एकास पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टीने पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे कीटकांचा प्रार्दुभाव झाला व याला अटकाव करण्यासाठी शेतकऱ्यांनी मारलेल्या कीटकनाशकाचा प्रभाव या किटकांवर पडल्याने शेतकरी कीटकांपासून शेती वाचवू न शकल्याने आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मूल तालुका हा प्रामुख्याने शेतकरी धानाचे पिक घेतले जाते या विभागात अनेक धान गिरण्याही आहेत व मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागते याबाबत शासन शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक सहाय्य करणार आहेत काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देऊन मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१३-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) असे निदर्शनास आलेले नाही.

(४) असे निदर्शनास आलेले नाही.

(५) बुलडाणा जिल्हयात शेगाव तालुक्यातील पहुरजिरा येथे चारचाकी वाहनामधून अनधिकृतपणे विना परवाना किटकनाशके व खताची विक्री करत असल्याचे निदर्शनास आले होते. सदर वाहनामधून खताचा ७८.२५ लि.रु.१.४१ लाख व किटकनाशकाचा एकूण ३.५ लि./२ कि.ग्र. रु.०.२९ लाख इतका साठा जप्त करण्यात येवून, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन जलंब, ता.शेगाव येथे गुन्हा क्र.०१६७/२३, दिनांक २९/०८/२०२३ अन्वये पोलीस गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेल्या खते/ किटकनाशके नमुन्यांपैकी अप्रमाणित आढळून आलेल्या नमुन्यांवर कायदयातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयाचे विभाजन करून स्थलांतरीत न करण्याबाबत**

**(४१) ७६४०५ (०८-०२-२०२४). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयाचे विभाजन करून स्थलांतरीत न करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. २३७ (28)

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०३-२०२४) :** (१) होय.

(२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग या कार्यालयाच्या विभाजनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड ( जि.पुणे) येथील खाजगी जागेत मोबाईल मनोरे उभारणाऱ्या कंपन्यांकडून मुद्रांक शुल्काची रक्कम वसूल करण्याबाबत.**

**(४२) ७६५०२ (०९-०२-२०२४). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड ( जि.पुणे) येथील पुणे व उर्वरित ग्रामीण भागात खाजगी मालकीच्या जागेत विविध खाजगी कंपन्यांनी एक हजारहून अधिक मनोऱ्यांची (मोबाइल टॉवर) उभारणी करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडविण्यात आल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त मनोऱ्यांच्या खाजगी कंपन्यांनी मुद्रांक शुल्क भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या मोबाइल मनोऱ्यांना मुद्रांक शुल्क भरल्याशिवाय उभारण्यास परवानगी देऊ नये, असे पत्र संबंधित महापालिकांना पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाचा मुद्रांक शुल्क भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या खाजगी कंपन्यांनी उभारलेल्या मोबाईल टॉवर काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०३-२०२४) :** (१) ,(२) व (३) होय, हे खरे आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांनी संबंधित कंपन्या व महानगरपालिका यांचे प्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करुन त्यांना मुद्रांक शुल्क भरण्याबाबत कळविले आहे. तसेच संबंधित कंपनीस नोटीस देवून अभय योजना २०२३ अंतर्गत कमी पडलेले मुद्रांक शुल्क व दंड रक्कम भरण्याबाबत कंपनीसोबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**धनेगाव येथील मांजरा प्रकल्पाजवळ शासनाचे मत्स बीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४३) ७६५१२ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव, (ता.केज, जि.बीड) येथील मांजरा प्रकल्पाजवळ शासनाचे मत्स्य बीज उत्पादन केंद्र असून सदर बिजोत्पादन केंद्र मागील दहा ते बारा वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासनाचे मत्स्य बीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३१ ऑगस्ट , २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे आहे. तथापि मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्र धनेगाव, ता. केज, जि.बीड भाडेपट्टीने देण्याबाबत दिनांक

३१/१०/२०२३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. दिनांक १४/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये मांजरा मत्स्यबीज उत्पादन केंद्र धनेगाव, ता.केज, जि.बीड भाडेपट्टीने देण्यात आलेले आहे. या अनुषंगाने करारपत्र व केंद्र हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पालघर तालुक्यात मंजूर तलाठी पदांपैकी २१ तलाठी कर्मचारी कार्यरत असल्याबाबत

**(४४) ७७४२२ (०९-०२-२०२४). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर उपविभागांतर्गत पालघर तालुक्यात ६४ मंजूर तलाठी पदांपैकी २१ तलाठी कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यरत २१ तलाठ्यांपैकी २ तलाठी निलंबित, १ कर्मचारी सेवावर्ग आणि ५ तलाठ्यांची पदोन्नती झाल्यामुळे केवळ १४ तलाठ्यांवरच ६४ तलाठी सज्जांचे कामकाज सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यात रिक्त असलेली तलाठ्यांची पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२४) :** (१) ,(२) व (३) अंशत: खरे आहे.
सद्यस्थितीत पालघर तालुक्यात तलाठी संवर्गाची ६३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १८ पदे भरलेली असून त्यामधील २ तलाठी निलंबित आहेत व ४५ पदे रिक्त आहेत. पालघर तालुक्यात तलाठी संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे संबंधीत तलाठ्यांना प्रशासकीय सोयीचे दृष्टीने तसेच नागरिकांचे शालेय विद्यार्थ्यांचे व शेतकऱ्यांच्या विविध कामाचा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पिकाच्या नुकसानीचे पंचनामे तसेच शासनाची विविध कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी कार्यरत तलाठी यांना त्यांचे मुळ साझाचे कार्यभार सांभाळून अन्य तलाठी साझेचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
तलाठी पद भरती परीक्षा २०२३ करिता दिनांक २६.०६.२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन ऑनलाईन पद्धतीने दिनांक १७.०८.२०२३ ते १४.०९.२०२३ दरम्यान परीक्षा पार पडली असून पालघर जिल्हयाकरिता एकूण १४३ रिक्त पदांकरिता परीक्षा पार पडली आहे. सदर परीक्षेचा निकाल माहे डिसेंबर, २०२३ मध्ये अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील बनावट शासकीय प्रमाणपत्रे तयार करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत

**(४५) ७७४२३ (०९-०२-२०२४). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात बनावट शासकीय प्रमाणपत्रे तयार करणारी टोळी सक्रिय असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक कामासाठी लागणारी विविध प्रमाणपत्रांची नोंद शासनाकडे कुठेही नसल्याने सदर प्रकरण निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट शासकीय प्रमाणपत्रे तयार करणा-या टोळीला अटक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही. जव्हार (जि.पालघर) तालुक्यात बनावट शासकीय प्रमाणपत्रे तयार करणारी टोळी सक्रिय असल्यासंदर्भात तहसिल कार्यालय, जव्हार येथे लेखी तक्रार प्राप्त नाही.
(२) अशी बाब नाही. जव्हार तहसील कार्यालयाद्वारे दिली जाणारी प्रमाणपत्रे संगणकीय प्रणालीमार्फत निर्गमित करण्यात

येत असल्याने प्रमाणपत्रे आणि दाखल्यांची नोंद संगणकीय प्रणालीमार्फत होत असते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कडेगाव (जि.सांगली) येथील आले पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(४६) ७७६३९ (११-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि.सांगली) येथे अस्थिर वातावरण, पाणी टंचाई व वाढती रोगराई यामुळे आले पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (११-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) महसूल वन विभाग शा.नि क्र एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये कडेगाव तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांना पाणी व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन याबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत किडरोग तीव्रता आटोक्यात आल्याने नुकसानीची तीव्रता कमी झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी केलेल्या सर्व अनियमिततेची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत**

**(४७) ७७८१६ (०९-०२-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४३ मधील प्रश्न क्रमांक ५५५८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे सह दुय्यम निबंधक वर्ग-२ श्री.गोपवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेवराई येथील कार्यालयात असतांना दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास बनावट गुंठेवारीच्या आधारे असलेले ३२ दस्त गुंठेवारीची प्रत ही दस्त नोंदणी कार्यालयामध्ये आली आहे किंवा नाही याची खात्री न करता बनावट दस्तांची नोंदणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही उक्त जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये सह दुय्यम निबंधक या पदावर अतिरिक्त स्वरुपात काम केलेले असून दस्त नोंदणीमध्ये त्यांनी गैरव्यवहार केल्याची तक्रार तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, औरंगाबाद जिल्हाधिकारी, बीड, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-०३-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मा. संदिप क्षिरसागर, आमदार, बीड यांनी दिनांक १३.१०.२०२२ अन्वये श्री. गोपवाड, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी केलेल्या अनियमितेची चौकशी करणेबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालयास लेखी तक्रार केली होती.

तसेच दिनांक ३०.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये बनावट गुंठेवारीच्या आधारे नोंदणी करण्यात आलेल्या ३२ दस्तांबाबत सह जिल्हा निबंधक वर्ग-१, बीड यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२) दिनांक १३.१०.२०२२ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड यांनी २ तपासणी पथके गठीत करुन तपासणी पथकाने दिलेल्या अहवालानुसार श्री.गोपवाड यांनी नोंदविलेल्या दस्तांपैकी न्युन मुद्रांकित दस्तांची महसूली तुटीची वसुलीची कार्यवाही महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३२ अ व ३३अ नुसार पूर्ण केली आहे.

तसेच दिनांक ३०.०१.२०२३ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने बनावट दस्त तयार करणा-या श्री. खोले बलकीम दगडू यांचेविरुध्द, दुय्यम निबंधक गेवराई यांनी भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८३ नुसार गुन्हा नोंद केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, पाटस, वरवंड व देऊळगाव राजे येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ चे श्रेणी-१ मध्ये करण्याबाबत

**(४८) ७७८९२ (१०-०२-२०२४). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत, पाटस, वरवंड व देऊळगाव राजे येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ कार्यरत असून या भागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी कुटुंबे राहत असल्याने पाळीव पशूंची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने या दवाखान्याचे श्रेणी-१ मध्ये श्रेणीवर्धन करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त दवाखान्याचे श्रेणी-१ मध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२४) :** (१) होय.

(२) व (३)

वित्त विभागाने आयुक्त पशुसंवर्धन यांच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध निश्चित झाल्याशिवाय नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांचा प्रस्ताव विचारात घेऊ नये, असे अभिप्राय दिले आहेत. आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू असून आकृतीबंधास मान्यता प्राप्त होताच पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येईल.

---

## बीड जिल्हा मजुर संघाने केलेल्या काम वाटपाची तपशीलवार छायांकित प्रत देण्याबाबत

**(४९) ७८९०४ (०६-०२-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मजुर संघाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ व २ बीड, नगर परिषद बीड, जायकवाडी पाटबंधारे विभाग बीड, कृषि विभाग बीड, या कार्यालयाच्यावतीने देण्यात आलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने काम वाटप पत्रे उलट टपाली दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्र व्यवहार, मजुर संघाने काम वाटप केलेली पत्रे, मजुर संघातील काम वाटप खतावणी वही, इतिवृत्त, आवक-जावक क्रमांक या सर्व बाबींची छायांकित प्रत नियमोचित तत्काळ मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील माहिती माहे नोव्हेंबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२३ हा कालावधीत ग्राह्य धरण्यात येऊन

नियमोचित उलट टपाली अहवालासह तत्काळ देण्याबाबत स्मरणपत्रासह व्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आजतागायत विभागाने अनुपालन केल्याचे दिसून येत नसल्याने राज्य वा जिल्हास्तरावरुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (११-०३-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक १७.११.२०२३, दिनांक २३.११.२०२३ व दिनांक १६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. विधानसभा सदस्य यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे मालकी हक्क असलेला प्लॉट चुकीच्या पध्दतीने अन्य व्यक्तीच्या नावावर केल्याबाबत.**

**(५०) ७९३१२ (०६-०२-२०२४). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी नगर परिषद हद्दीतील साई नगर येथे सन १९९० पासुन प्लॉट क्र. ३७/५७ आराजी २.७४ या नावाने प्लॉटवर घर बांधकाम झालेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.भागवत नथुजी चोपडे, रा. अमरावती यांनी केलेल्या दुरूस्ती तक्रार दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास नायब तहसिलदार श्री.मगर यांनी दुरूस्ती आदेश केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.वानम नथुजी चोपडे यांच्या मालकीचा असलेला प्लॉट श्री.भागवत चोपडे यांच्या नावाने आदेश केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नायब तहसिलदार यांनी केलेल्या चुकीचा आदेश रद्द करून श्री.वामनराव चोपडे यांच्या नावाने त्यांची मालकी असलेला प्लॉट कायम ठेवण्याबाबत शासन निर्देश देणार आहे काय,असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०३-२०२४) :** (१) , (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) उपविभागीय अधिकारी, आर्वी यांच्या दिनांक ०८.०१.२०२४ च्या आदेशान्वये नायब तहसिलदार, आर्वी यांचा दिनांक २०.०१.२०२२ चा आदेश, तसेच त्याबाबत तलाठी दाऊतपूर यांनी घेतलेला फेरफार क्र.२६७६ हा रद्द करुन श्री.वामन नथ्थुजी चोपडे यांचे नावांने ७/१२ दुरुस्त करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.